**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/०८/वेतनपथक, पुणे दिनांक - १८ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय - राज्यातील अकृषि विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन विहीत वेळेत करणेबाबत.**

संदर्भ - शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक अर्थसं २०२०/संकीर्ण/वेतन अदा/लेखा-२/७६५३ दिनांक १७ नोव्हेंबर, २०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सोबत प्रत जोडली आहे.

विभागीय सहसंचालकांकडून विहीत वेळेत वेतन अदा केल्यानंतरही संबंधीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बँक खात्यामध्ये दिनांक ०१ रोजी वेतन अदा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच याबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व विविध संघटनांकडून प्राप्त झालेल आहेत. याबाबतची वस्तुस्थिती तपासली असता दिसून येते की, काही महाविद्यालयांचे बँकेतील वेतनाचे खाते संयुक्त (दुहेरी स्वाक्षरी) असल्याने कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यास विलंब होत असल्याचे आढळून आले आहे. सबब प्राचार्यांचे सदर बँकेतील वेतन अदयगीचे खाते एकरी स्वाक्षरी (Single Sign Account) चे असल्यास विभागीय सहसंचालकांकडून विहीत वेळैत महाविद्यालयांना वेतन अदा केल्यानंतर त्याच दिवशी अथवा प्रत्येक महिन्याच्या दिनांक ०१ रोजी प्राचार्यांच्या खातेवरुन संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या खातेवर वेतन अदा करणे शक्य होईल.

तरी वरीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

१८/११

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे